असा. क्र. ३१ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००२

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

प्राधिकृत प्रकाशन

शनिवार, मे ४, २००२/वैशाख १४, शके १९२४

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम

अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०.—महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम .. .. .. | २०४-२१९ |


दिनांक ३ मे २००२ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ४ मे २००२ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.).

**महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या त्रेपन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे व सुधारणा) अधिनियम, २००२ असे म्हणावे.

(२) (क) कलमे १ ते ८, १० ते १२, १४, १५, १७, १८, २० ते २७, २९ दिनांक १ मे २००२ रोजी अंमलात येतील.

(ख) कलमे ९, १६, १९ आणि २८ त्या कलमांमध्ये स्पष्टपणे नमूद केलेल्या दिनांकांना अंमलात येतील.

(ग) कलम १३, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियुक्त करील अशा दिनांकाला अंमलात येईल.

## प्रकरण दोन

### मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ ची सुधारणा.

सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ याच्या कलम २ ची सुधारणा. २. मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ (या अधिनियमात पुढे ज्याचा निर्देश " करमणूक शुल्क अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ मधील,-- १९२३ चा मुंबई १.

(क) खंड (अ) मधील, " केबल दूरचित्रवाणीच्या " या मजकुरानंतर, " किंवा थेट घरपोच प्रसारण सेवेच्या (Direct-to-Home (DTH) Broadcasting service) " हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (ब) मधील,—

(एक) खंड (तीन-अ) मधील, " आणि " हा शब्द वगळण्यात येईल ;

(दोन) नोंद (सहा) मध्ये शेवटी, " आणि " हा शब्द जादा दाखल करण्यात येईल ;

(तीन) नोंद (सहा) नंतर, पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईल :--

" (सात) जोडणीधारकाच्या निवासी किंवा अनिवासी जागेतील दूरचित्रवाणी संच सॅटेलाईटशी थेट जोडणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या सेट टॉप बॉक्सच्या सहाय्याने किंवा तत्सम स्वरूपाच्या उपकरणाच्या सहाय्याने पुरवण्यात येणाऱ्या थेट घरपोच प्रसारण सेवेसाठी (Direct-to-Home (DTH) Broadcasting service), थेट घरपोच प्रसारण सेवेच्या मालकास, एखाद्या व्यक्तीने, अंशदान, वर्गणी, (उपकरण) बसविण्याचा व जोडण्याचा खर्च किंवा इतर कोणत्याही प्रकारे वसूल करण्यात येणारे इतर कोणतेही आकार म्हणून दिलेला कोणताही पैसा ;";

(ग) खंड (क) मधील,--

(एक) नोंद (आठ) मधील, " किंवा " हा शब्द वगळण्यात येईल ;

(दोन) नोंद (नऊ) च्या शेवटी, " किंवा " हा शब्द जादा दाखल करण्यात येईल ;

(तीन) नोंद (नऊ) नंतर, पुढील नोंदी जादा दाखल करण्यात येतील :—

" (दहा) किंवा कोणत्याही गो-कार्टींग (Go-carting) केंद्राच्या व्यवस्थापनास जबाबदार असणारी किंवा त्यावेळी त्याची प्रभारी असणारी एखादी भागिदारी संस्था, निगम निकाय किंवा कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये नोंदणी झालेली कंपनी ; १९५६ चा १.

(अकरा) किंवा व्हिडिओ सुविधा असणाऱ्या प्रवासी बसची मालकी असणारी एखादी
१९५६ भागिदारी संस्था, निगम निकाय किंवा कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये नोंदणी झालेली
चा १. कंपनी ;

१८८५ (बारा) किंवा भारतीय तार अधिनियम, १८८५ आणि भारतीय बिनतारी संदेश व्यवस्था
चा १३. अधिनियम, १९३३ अन्वये भारत सरकारकडून, थेट घरपोच प्रसारण सेवा (Direct-to-Home
१९३३ (DTH) Broadcasting service) पुरवण्याचे लायसन असणारी अशी कंपनी अधिनियम,
चा १७. १९५६ अन्वये नोंदणी झालेली एखादी कंपनी ";
१९५६
चा १.

(घ) खंड (ड) मधील, "केबल दूरचित्रवाणीपासून " या मजकुरानंतर "किंवा थेट घरपोच प्रसारण सेवेपासून (Direct-to-Home (DTH) Broadcasting service) " हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल ;

(ङ) खंड (ईई) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :--

(ई-ई.१) "थेट घरपोच प्रसारण सेवा (Direct-to-Home (DTH) Broadcasting service) " याचा अर्थ केबल चालक या सारख्या मध्यस्थामार्फत न जाता वर्गणीदाराच्या जागेत थेट दूरचित्रवाणी संकेत पोहोचवण्याची व्यवस्था करून सॅटेलाईट पद्धतीच्या वापराद्वारे कू बँडमधील बहुविध वाहिन्यांचे दूरचित्रवाणी कार्यक्रम वितरित करण्याची पद्धत असा आहे ;

**स्पष्टीकरण.**--हा खंड आणि खंड (ग-१अ) याच्या प्रयोजनार्थ, " 'के यू बँड' (Ku Band) " याचा सामान्यपणे अर्थ, ११.७-१२.७ जीएचझेड (गिगा हर्टझ्) फ्रिक्वेन्सी बँड, ज्याचे दोन खंडात विभाजन होते, ते असे, पहिला ११.७-१२.२ गिगा हर्टझ् फ्रिक्वेन्सी असलेला बँड हा एफएसएस (फिक्सड् सॅटेलाईट सर्विस) म्हणून ओळखला जातो आणि दुसरा १२-२-१२.७ गिगा हर्टझ् फ्रिक्वेन्सी असलेला बीएसएस (ब्रॉडकास्टींग सॅटेलाईट सर्विस) म्हणून ओळखला जातो किंवा वेळोवेळी, भारत सरकारद्वारा मान्य केले जातील असे इतर बँडविड्थ त्यामध्ये असू शकतात.";

(च) खंड (ग) मधील, परिच्छेद (दोन) मध्ये, " केबल जोडणी देण्याच्या व्यवस्थेविषयक " या शब्दानंतर पूर्ण होणाऱ्या कंसात " किंवा थेट घरपोच प्रसारण सेवेची तरतूद करणाऱ्या व्यवस्थेविषयक (डीटीएच)" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(छ) खंड (ग) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (ग-१अ) " सेट टॉप बॉक्स " याचा अर्थ, थेट सॅटेलाईटवरून डिश ॲन्टेनामार्फत अमूर्त स्वरूपातील दूरचित्रवाणी संकेत गोळा करून ते मूर्त स्वरूपात दूरचित्रवाणी संचाकडे प्रसारित करणारा निवासी किंवा अनिवासी जागेतील दूरचित्रवाणी संचाला जोडलेला उपकरण संच, असा आहे. ज्यामुळे, मालकाने कोणत्याही रीतीने गोळा केलेले शुल्क जोडणीधारकाने प्रदान केल्यावर प्रेक्षकांना के यू बँडमधील बहुविध वाहिन्यांचे दूरचित्रवाणी कार्यक्रम लावून पाहणे शक्य होते ;";

(ज) खंड (ग-२) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :--

" (ग-३) " पुरस्कर्त्याची रक्कम " याचा अर्थ, करमणूक कार्यक्रमाच्या आयोजकाला पुरस्कर्त्याचे उत्पादन किंवा त्याचे ब्रँड नाव इत्यादीच्या जाहिरातीच्या बदल्यात पुरस्कर्त्याकडून देण्यात आलेली रक्कम, असा आहे.".

१९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ ची सुधारणा.

३. करमणूक शुल्क अधिनियमाच्या कलम ३ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मध्ये,—

(एक) " व्हिडिओ खेळ आणि कोणत्याही प्रकारच्या ॲन्टेनाच्या किंवा केबल दूरचित्रवाणीच्या साह्याने केले जाणारे प्रदर्शन यांव्यतिरिक्त " या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" व्हिडिओ खेळ, कोणत्याही प्रकारच्या ॲन्टेनाच्या किंवा केबल दूरचित्रवाणीच्या साह्याने केले जाणारे प्रदर्शन किंवा थेट घरपोच प्रसारण सेवा (डीटीएच) याच्या साह्याने केले जाणारे प्रदर्शन, बोलींग ॲली, गो-कार्टींग, नृत्य बार, डिस्कोथेक, मनोरंजन पार्क, जलक्रीडा कार्यक्रम, पुलगेम यांव्यतिरिक्त ";

(दोन) खंड (ब) मधील, पहिल्या परंतुकातील, " किंवा डिस्कोथेक " हे शब्द वगळण्यात येतील ;

(ख) पोट-कलम (१२) मधील, " अशा कार्यक्रमाच्या किंवा प्रयोगाच्या प्रवेशाची रक्कम शंभर रुपयांहून अधिक असेल तर, अशा कार्यक्रमांच्या किंवा प्रयोगाच्या बाबतीत " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (१३) नंतर पुढील पोट-कलमे जादा दाखल करण्यात येतील :—

" (१४) पोट-कलम (१) च्या खंड (ब) मध्ये किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक गो-कार्टींग केंद्राच्या मालकाकडून दरमहा प्रत्येक कारला रु. २,००० या दराने प्रत्येक कारच्याबाबतीत आगाऊ करमणूक शुल्क आकारण्यात येईल आणि ते प्रत्येक कॅलेंडर महिन्याच्या दहा तारखेपर्यंत राज्य शासनाकडे भरण्यात येईल.

(१५) पोट-कलम (१) च्या खंड (ब) मध्ये किंवा पोट-कलम (४) मध्ये किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही इतर तरतुदींमध्ये काही ही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक थेट-घरपोच प्रसारण सेवेच्या (डीटीएच) मालकाकडून प्रति दूरचित्रवाणी संचावर, जो थेट-घरपोच प्रसारण सेवेमार्फत (डीटीएच) प्रक्षेपण करण्यासाठी त्याला जोडलेल्या सेटटॉप बॉक्सच्या किंवा कोणत्याही इतर उपकरणाच्या सहाय्याने चित्रपट किंवा चलचित्रे किंवा चित्रमालिका यांच्या प्रदर्शनासाठी रेडिओ फ्रिक्वेन्सी सिग्नल स्वीकारतो त्यावर, पुढील तक्त्यात त्या त्या क्षेत्रासाठी विनिर्दिष्ट केलेल्या दराने करमणूक शुल्क आकारण्यात येईल आणि प्रत्येक कॅलेंडर महिन्याच्या दहा तारखेपर्यंत ते राज्य शासनाकडे भरण्यात येईल :—

तक्ता

| अ.क्र. (१) | क्षेत्र (२) | प्रति महिना, प्रति दूरचित्रवाणी संचावरील करमणूक शुल्काची रक्कम (३) |
|---|---|---|
| | | (रुपये) |
| १ | महानगरपालिकांच्या व कंटोनमेंटच्या हद्दीतील. | ९० |
| २ | 'अ' व 'ब' वर्ग नगरपरिषदांच्या हद्दीतील. | ६० |
| ३ | वरील नोंदी १ आणि २ च्या कक्षेत नसलेली कोणतीही इतर क्षेत्रे. | ३० |

(१६) पोट-कलम (१) च्या खंड (ब) मध्ये किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही इतर तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, व्हिडिओ सुविधा असलेल्या प्रत्येक पर्यटन बसच्या मालकाकडून, प्रत्येक कॅलेंडर वर्षातील जानेवारी महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत अशा बसच्या बाबतीत, प्रत्येक बसवर प्रतिवर्षी रु. १,००० या दराने करमणूक शुल्क आकारण्यात येईल व ते राज्य शासनाला आगाऊ देण्यात येईल.

(१७) पोट-कलम (१) चा खंड (ब) किंवा पोट-कलम (२) यामध्ये किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही इतर तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्यातील प्रत्येक डिस्कोथेकच्या मालकाकडून, प्रत्येक कॅलेंडर महिन्याच्या दहा तारखेपर्यंत अशा डिस्कोथेकच्या बाबतीत, पुढील तक्त्यात विनिर्दिष्ट केलेल्या दराने आणि प्रवर्गानुसार करमणूक शुल्क आकारण्यात येईल व ते, राज्य शासनाला आगाऊ देण्यात येईल.

तक्ता

| अ.क्र. (१) | प्रवर्ग (२) | प्रति महिना आगाऊ भरावयाची करमणूक शुल्काची रक्कम (३) |
|---|---|---|
| | | (रुपये) |
| १ | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत येणाऱ्या पंचतारांकित हॉटेलातील डिस्कोथेक. | ५०,००० |
| २ | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीबाहेरील पंचतारांकित हॉटेलातील डिस्कोथेक. | ४०,००० |
| ३ | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील डिस्कोथेक (पंचतारांकित हॉटेलात असलेले सोडून). | २५,००० |
| ४ | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीबाहेरील डिस्कोथेक (पंचतारांकित हॉटेलात असलेले सोडून). | १५,०००". |

सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ च्या कलम ३-अअ ची सुधारणा.

४. मुंबई करमणूक शुल्क अधिनियमाच्या कलम ३-अअ मधील, पोट-कलम (१) मध्ये, " किंवा केबल दूरचित्रवाणीद्वारे " या मजकुरानंतर, " आणि थेट-घरपोच प्रसारण सेवेद्वारे (डीटीएच) " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ च्या कलम ४ ची सुधारणा.

५. करमणूक शुल्क अधिनियमाच्या कलम ४ मध्ये,—

(क) पोट-कलम (२) मध्ये, " ज्या करमणुकीच्या बाबतीत " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " परवानगी देता येईल " या मजकुराने संपणाऱ्या मुख्य खंडाऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" ज्या करमणुकीच्या बाबतीत कलम ३ अन्वये करमणूक शुल्क देय असेल अशा कोणत्याही करमणूक कार्यक्रमाचा मालक, प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या पंधरा जानेवारीपर्यंत, देय झालेले आणि देय असलेले करमणूक शुल्क प्रदान करण्यास त्याला परवानगी मिळण्यासाठी विहित अधिकाऱ्याकडे अर्ज करील आणि विहित अधिकारी असा अर्ज मिळाल्यानंतर, राज्य शासन त्या बाबतीत काढलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा शर्तींच्या आधारे, मालकाला देय करमणूक शुल्काची रक्कम चुकती करण्याची परवानगी देईल ";

(ख) विद्यमान परंतुकानंतर पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु आणखी असे की, विहित अधिकारी, वर सांगितल्याप्रमाणे अर्ज प्राप्त झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत, अर्जदाराला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन आणि फेटाळण्याची कारणे नमूद करून, तो अर्ज फेटाळील.".

सन १९२३ चा अधिनियम क्रमांक १ यात ४ड व ४ई ही नवीन कलमे समाविष्ट करणे.

६. करमणूक शुल्क अधिनियमाच्या कलम ४क नंतर पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

गो-कार्टींग केंद्रातील चालू नसलेल्या किंवा उत्पन्न न मिळणाऱ्या कारच्याबाबतीत सूट किंवा परतावा.

" ४ड. (१) जेव्हा गो-कार्टींग केंद्रामध्ये चालू असलेल्या कारच्या एकूण संख्येवर प्रति कार प्रति महिना २,००० रुपये या दराने गो-कार्टींगच्या बाबतीत करमणूक शुल्क देय असेल आणि जर, एखादी कार संपूर्ण महिनाभर किंवा असे शुल्क देय असणाऱ्या महिन्याच्या काही कालावधीमध्ये कोणत्याही करमणूक कार्यक्रमासाठी चालू नसेल आणि तिच्यापासून उत्पन्न मिळाले नसेल तर, ज्या कालावधीसाठी ती कार अशाप्रकारे चालू नसेल आणि तिच्यापासून उत्पन्न मिळालेले नसेल तर त्या कालावधीच्या प्रमाणानुसार विहित अधिकारी शुल्कात सूट देईल किंवा शुल्काचा परतावा देईल :

परंतु, एखादी कार संपूर्ण महिनाभर किंवा महिन्याच्या काही कालावधीमध्ये अशा प्रकारे चालू नव्हती आणि तिच्यापासून कोणतेही उत्पन्न मिळाले नाही, अशी लेखी नोटीस, ती अशी चालू नसण्याच्या किंवा तिच्यापासून उत्पन्न न मिळण्याच्या तपशिलांसह, विहित अधिकाऱ्याकडे व्यक्तिशः दिल्याशिवाय आणि त्याची पोचपावती घेतल्याशिवाय किंवा टपाल दाखला घेऊन दिल्याशिवाय अशी कोणतीही सूट किंवा परतावा दिला जाणार नाही आणि अशी कोणतीही सूट किंवा परतावा अशा पोचपावतीच्या किंवा टपाल दाखला प्रमाणपत्राच्या दिनांकापूर्वीच्या कालावधीकरिता अनुज्ञेय असणार नाही.

(२) या कलमान्वये अशाप्रकारे सूट मिळण्यासाठी दावा करण्याचा एखाद्या व्यक्तीस हक्क प्राप्त होण्यासाठी एखादी कार चालू नव्हती किंवा तिच्यापासून कोणतेही उत्पन्न मिळाले नाही, हे सिद्ध करण्याचे बंधन अशा व्यक्तीवरच राहील.

जाहीर लिलाव किंवा एजंट या मार्फत केबल दूरचित्रवाणीवरील शुल्काची वसुली.

४ई. (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, एका वेळी तीन वर्षांपेक्षा जास्त नाही अशा कोणत्याही कालावधीकरिता, थेट घरपोच (डीटीएच) प्रसारण सेवेवरील आकारणीयोग्य करमणूक शुल्कासह केबल दूरचित्रवाणीवरील करमणूक शुल्क, जाहीर लिलावाद्वारे पट्ट्याने देणे किंवा त्याच्या वसुलीकरिता एजंट नियुक्त करणे हे राज्य शासनासाठी कायदेशीर असेल.

(२) जेथे थेट घरपोच प्रसारण सेवेवरील (डीटीएच) आकारणीयोग्य करमणूक शुल्कासह केबल दूरचित्रवाणीवरील करमणूक शुल्क वसूल करणे अशाप्रकारे पट्ट्याने दिले असेल किंवा जेथे अशाप्रकारे एजंट नियुक्त करण्यात आला असेल तेथे पट्टेदाराने किंवा एजंटाने कामावर ठेवलेली व्यक्ती पट्ट्याच्या शर्तीच्या किंवा यथास्थिती एजन्सीच्या कराराच्या अधीनतेने, घरपोच प्रसारण सेवेवरील आकारणीयोग्य करमणूक शुल्कासह केबल दूरचित्रवाणीवरील करमणूक शुल्क वसूल करण्यासाठी राज्य शासनाने प्राधिकृत केलेले अधिकारी व कर्मचारी यांना या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर आणि त्यांच्यावर लादण्यात आलेल्या कर्तव्यांचे पालन, त्याबाबतीत विहित अधिकाऱ्याने त्यांना यथोचितरित्या प्राधिकृत केल्यानंतर, करतील.

(३) राज्य शासनाने, याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे वेळोवेळी काढलेल्या निदेशांच्या अधीनतेने, कोणतेही असल्यास, विहित अधिकारी थेट घरपोच (डीटीएच) प्रसारण सेवेवरील आकारणी योग्य करमणूक शुल्कासह केबल दूरचित्रवाणीवरील करमणूक शुल्क वसुलीचे, अशा पट्टेदारामार्फत किंवा एजंटमार्फत, विहित करण्यात येईल, अशारीतीने व कार्यपद्धतीनुसार नियमन करील.".

सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ७ ची सुधारणा.

७. करमणूक शुल्क अधिनियमाचे कलम ७, पोट-कलम (१) मध्ये, खंड (आय) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :—

" (ज) घरपोच प्रसारण सेवेसह (डीटीएच) केबल दूरचित्रवाणीवरील करमणूक शुल्काची वसुली जाहीर लिलावाद्वारे करणे.".

## प्रकरण तीन

### मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ याची सुधारणा.

१९५८ चा मुंबई ६०. ८. मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ ला जोडलेल्या अनुसूची एक मधील,— सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६० याच्या अनुसूची एक ची सुधारणा.

(क) अनुच्छेद ६ मध्ये,—

(एक) खंड (१) व (२) यांऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येतील :—

| | |
|---|---|
| "(१) हक्कविलेख किंवा (विक्रेय प्रतिभूतिपत्राखेरीज इतर) कोणत्याही प्रकारच्या मालमत्तेवर हक्क प्रस्थापित करणारा किंवा अशा हक्काचा पुरावा असणारा संलेख जेथे तो कर्जाच्या स्वरूपात दिलेल्या किंवा द्यावयाच्या पैशाच्या अथवा विद्यमान किंवा भावी ऋणाच्या परतफेडीबद्दल प्रतिभूतीच्या स्वरूपात निक्षेपित केलेला असेल, त्याबाबतीत असा हक्कविलेख किंवा संलेख निक्षेप म्हणून ठेवणे ; | अनुच्छेद ४० च्या खंड (ब) अन्वये गहाणखतावर आकारणीयोग्य असेल तितके शुल्क. |
| (२) जंगम मालमत्तेचे हडप, तारण किंवा तारणगहाण, जेथे कर्जाच्या स्वरूपात दिलेल्या किंवा द्यावयाच्या पैशाच्या अथवा विद्यमान किंवा भावी ऋणाच्या परतफेडीबद्दल प्रतिभूतीच्या रूपाने असे हडप, तारण किंवा तारणगहाण करण्यात आले असेल अशा बाबतीत ; | अनुच्छेद ४० च्या खंड (ब) अन्वये गहाणखतावर आकारणी योग्य असेल तितके शुल्क."; |

(दोन) विद्यमान स्पष्टीकरणास 'स्पष्टीकरण एक' असा क्रमांक देण्यात येईल आणि अशा प्रकारे क्रमांक दिलेल्या 'स्पष्टीकरण एक' नंतर पुढील स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात येईल :—

"**स्पष्टीकरण दोन.**—या अनुच्छेदाच्या प्रयोजनार्थ, रुपये दहा लाख इतके कमाल शुल्क हे, एकावेळी होणाऱ्या व्यवहाराचा अंतर्भाव असलेल्या एकल संलेखासाठी आकारणी योग्य असेल. त्याच मालमत्तेच्या संबंधातील इतर किंवा त्यानंतरच्या व्यवहाराचा संलेख अथवा त्याच संलेखामधील नूतनीकरणाच्या खंडाचा व्यवहार हा, नवीन संलेख समजण्यात येईल :";

(ख) अनुच्छेद १३ मधील, स्तंभ २ मध्ये, "वीस रुपये" या मजकुराऐवजी "पाच रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) अनुच्छेद ३३ मधील, खंड (ब) मध्ये, उप-खंड (दोन) च्या समोरील स्तंभ २ मध्ये, "२,००,००० रुपयांच्या कमाल मर्यादेच्या अधीनतेने," या मजकुराने सुरू होणाऱ्या व "दहा रुपये" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"अशा संलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या ज्यादा प्रकाराच्या रकमेवर, अनुच्छेद ४० च्या खंड (ब) अन्वये आकारणीयोग्य असेल तितके शुल्क.";

(घ) अनुच्छेद ३४ मधील, स्तंभ २ मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :--

" परंतु, मालमत्ता ही दात्याचा पती, पत्नी, भाऊ किंवा बहीण असलेल्या कुटुंब सदस्याला किंवा दात्याच्या कोणत्याही वंशपरंपरागत पूर्वजाला किंवा वंशजाला दान केली असेल तर, आकारणीयोग्य असलेल्या शुल्काची रक्कम ही, या अनुच्छेदामध्ये विनिर्दिष्ट केला असेल त्याच दराने अथवा जी दानाची विषय-वस्तू आहे अशा मालमत्तेच्या बाजारमूल्यावर, प्रत्येकी पाचशे रूपयांसाठी किंवा त्याच्या भागासाठी दहा रुपये या दराने, यांपैकी जी कमी असेल ती असेल.".

(ङ) अनुच्छेद ३६अ ऐवजी, पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येईल :--

" ३६अ. **संमती-नि-परवानगी (लिव्ह ॲन्ड लायसेन्स) करारनामा**--

| | |
|---|---|
| (अ) संमती-नि-परवानगी करारनामा, अकरा महिन्यांच्या एका अवधीपेक्षा अधिक परंतु अशा तीन अवधींपेक्षा अधिक नाही अशा अवधीसाठी असल्याचे अभिप्रेत असेल त्याबाबतीत,-- | |
| (एक) जेथे सरासरी वार्षिक भाड्याची रक्कम अधिक प्रतिभूति ठेवीची रक्कम, किंवा दिलेले अथवा द्यावयाचे अग्रिम धन, दोन लाख पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल तेथे ; | पाचशे रुपये ; |
| (दोन) जेथे सरासरी वार्षिक भाड्याची रक्कम अधिक प्रतिभूति ठेवीची रक्कम, किंवा दिलेले अथवा द्यावयाचे अग्रिम धन, दोन लाख पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक असेल, परंतु पाच लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल तेथे ; | एक हजार रुपये ; |
| (तीन) जेथे सरासरी वार्षिक भाड्याची रक्कम अधिक प्रतिभूति ठेवीची रक्कम, किंवा दिलेले अथवा द्यावयाचे अग्रिम धन, पाच लाख रुपयांपेक्षा अधिक असेल तेथे ; | दोन हजार रुपये ; |
| (ब) जेथे नवीकरण खंडासह किंवा खंडाशिवाय हा संमती-नि-परवानगी करारनामा, खंड (अ) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे तीन अवधींपेक्षा अधिक असणाऱ्या कालावधीसाठी असल्याचे अभिप्रेत असेल त्याबाबतीत ; | अनुच्छेद ३६ च्या यथास्थिति खंड (अ), (ब) किंवा (क) अनुसार, भाडेपट्ट्यावर आकारणी योग्य असेल तेवढेच शुल्क."; |

(च) अनुच्छेद ४० मध्ये,--

(एक) " हक्कलेख निक्षेप, हडप किंवा तारण, किंवा तारणगहाण यांसंबंधीचा करारनामा (अनुच्छेद ६) " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(दोन) खंड (ब) मधील, स्तंभ (२) मध्ये, " २,००,००० रुपयांच्या कमाल मर्यादेस " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " त्याच्या भागाकरिता दहा रुपये " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :--

" अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेसाठी, शंभर रुपयांच्या किमान मर्यादेस आणि दहा लाख रुपयांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून, दर पाचशे रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता पाच रुपये. ";

(छ) अनुच्छेद ५४ मध्ये, खंड (दोन) मधील, स्तंभ २ मध्ये, " जास्तीत जास्त रुपये २,००,००० इतक्या " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " देय असलेल्या शुल्काबद्दल समायोजित करण्यांत येईल." या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" अनुच्छेद ४० च्या खंड (ब) अनुसार आकारणीयोग्य असेल तेवढेच शुल्क :

परंतु, जिच्यासाठी एखादी व्यक्ती जामीन राहिली आहे किंवा तिने प्रतिभूति बंधपत्र करून दिलेले आहे अशा एखाद्या व्यक्तीकडून करण्यात आलेल्या एखाद्या विलेखावर अनुच्छेद ६ किंवा ४० यानुसार शुल्क भरले असेल त्याबाबतीत, शंभर रुपये एवढे शुल्क देय असेल.";

(ज) अनुच्छेद ५८ ऐवजी पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येईल :—

**" ५८. भाडेपट्ट्याच्या प्रत्यर्पणासाठीच्या करारनाम्यासह भाडेपट्ट्याचा प्रत्यर्पण लेख—**

| | |
|---|---|
| (अ) कोणत्याही मोबदल्याशिवाय | दोनशे रुपये ; |
| (ब) मोबदल्यासह | अनुच्छेद २५ च्या खंड (अ), (ब), (क) किंवा (ड) अनुसार मोबदल्याच्या रकमेवर आकारणीयोग्य असेल तेवढेच शुल्क.". |

**स्पष्टीकरण.**—या अनुच्छेदाच्या प्रयोजनांसाठी, प्रतिभूति ठेवीवर पट्टेदाराने पट्टाकाराला अग्रिम म्हणून परत केलेल धन हे, प्रत्यर्पणाचा मोबदला म्हणून समजण्यात येणार नाही.

## प्रकरण चार

### मुंबई मोटार स्पिरिट विक्री कराधान अधिनियम, १९५८ याची सुधारणा.

सन १९५८ चा मुंबई ६६. ९. मुंबई मोटार स्पिरिट विक्री कराधान अधिनियम, १९५८ याच्या कलम ५ मध्ये,—

(क) पोट-कलम २ मध्ये पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल आणि ते, ११ मे २००१ पासून जादा दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल :— सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६६ याच्या कलम ५ ची सुधारणा.

१९५६ चा ७४. " परंतु, केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६ याच्या कलम १४ च्या खंड (दोन घ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या टर्बो-प्रॉप एअरक्राफ्टमध्ये वापरण्याकरिता विकलेल्या, विमानचालन टर्बाइन इंधनाच्या विक्रीवर, ४ टक्के या दराने कर आकारण्यात येईल.";

(ख) पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (३) पोट-कलम (१) किंवा (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (२) अनुसार आकारण्यात येणाऱ्या कराच्या जोडीला आणखी टर्बो-प्रॉप एअरक्राफ्टमध्ये वापरण्याकरिता विकलेल्या विमानचालन टर्बाइन इंधनाव्यतिरिक्त अन्य मोटार स्पिरिटच्या विक्रीवर, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा दराने, विकलेल्या मोटार स्पिरिटच्या प्रत्येक लिटरवर अधिभार आकारण्यात येईल आणि मोटार स्पिरिटच्या विविध प्रकारांसाठी वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करण्यात येतील :

परंतु, मोटार स्पिरिटच्या कोणत्याही प्रकारासाठी विनिर्दिष्ट केलेला असा दर प्रति लिटर दोन रुपयांपेक्षा अधिक असणार नाही.'';

(ग) समास टीपेमध्ये, '' कर '' या शब्दाऐवजी, '' कर व अधिभार '' हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## प्रकरण पाच

### महाराष्ट्र ऊस खरेदी कर अधिनियम, १९६२ याची सुधारणा.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम २ ची सुधारणा.

१०. महाराष्ट्र ऊस खरेदी कर अधिनियम, १९६२ (या अधिनियमात यापुढे ज्याचा निर्देश '' ऊस खरेदी कर अधिनियम '' असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ मधील, खंड (फ-अ), (फ-ब) आणि (ग-अ) वगळण्यात येतील. १९६२ चा महा. ९.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ३ ऐवजी नवीन कलम दाखल करणे.

११. ऊस खरेदी कर अधिनियमाच्या कलम ३ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

खरेदी कर बसविणे.

'' ३. (१) कारखान्यामध्ये किंवा युनिटामध्ये साखरेची निर्मिती किंवा साखरेचे उत्पादन करण्याच्या कामी वापरण्यासाठी खरेदी करण्यात येणाऱ्या उसाच्या खरेदीवर कर बसविण्यात येईल व तो वसूल करण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये, उपरोक्त प्रयोजनासाठी खरेदी केलेल्या उसाच्या प्रति किलोग्रॅमला, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा दराने कर बसविण्यात येईल आणि कारखान्यात साखरेची व युनिटमध्ये खांडसरी साखरेची निर्मिती किंवा उत्पादन करण्यासाठी खरेदी केलेल्या उसासाठी वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करण्यात येतील :

परंतु, राज्य शासनाने **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी, विकसित क्षेत्रे किंवा अविकसित क्षेत्रे म्हणून घोषित केलेल्या क्षेत्रांमधील युनिटांमध्ये खांडसरी साखरेची निर्मिती किंवा उत्पादन करण्यासाठी खरेदी केलेल्या उसाकरिता वेगवेगळे दरसुद्धा विनिर्दिष्ट करता येतील, तथापि, अशा रीतीने विनिर्दिष्ट केलेला किंवा केलेले दर अशी खरेदी केलेल्या उसाच्या प्रति किलोग्रॅमला चार पैशांपेक्षा जास्त असणार नाहीत.

(३) पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, कर बसवण्याच्या प्रयोजनार्थ, अशा रीतीने खरेदी केलेल्या उसाच्या स्थूल वजनातून, साखरेचा कोणताही अंश नसलेले उसाचे शेंडे व पाने आणि उसात नेहमी आढळणारा इतर पाचोळा यांचे सरासरी वजन दर्शविणारे जे प्रमाण विहित करण्यात येईल त्या प्रमाणाइतके वजन वजा करण्यात येईल; आणि अशा रीतीने वजन वजा केल्यावर उसाच्या केवळ उर्वरित वजनावर कर बसविण्यात येईल.

(४) पूर्ववर्ती पोट-कलमान्वये बसविण्यात आलेला कर, कारखान्याच्या, किंवा यथास्थिति, युनिटाच्या भोगवटादाराकडून यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे, अशा कालांतराने व अशा रीतीने प्रदान करण्यात येईल. ''.

१२. ऊस खरेदी कर अधिनियमाच्या कलम ६ मधील, पोट-कलम (१) मध्ये, " उसाच्या खरेदीची उलाढाल ", या मजकुराऐवजी, " उसाचे किलोग्रॅममध्ये एकूण परिमाण " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ६ ची सुधारणा.

## प्रकरण सहा

## मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ याची सुधारणा.

१९५९ चा मुंबई ५१. १३. मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ (या अधिनियमात यापुढे ज्याचा निर्देश " मुंबई विक्रीकर अधिनियम " असा केला आहे), याच्या कलम ७ मध्ये,— सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५१ याच्या कलम ७ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (१) मधील,—

(एक) खंड (एक) मधील, " मालाची फेरविक्री " या मजकुरापूर्वी पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

", अनुसूची ख च्या नोंद ६ च्या कक्षेत येणाऱ्या मालाच्या व्यतिरिक्त अन्य ;";

(दोन) खंड (दोन) मधील, " मालाची फेरविक्री " या मजकुरापूर्वी पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

", अनुसूची ख च्या नोंद ६ च्या कक्षेत येणाऱ्या मालाच्या व्यतिरिक्त अन्य ;";

(तीन) खंड (तीन) मधील, " मालाची फेरविक्री " या मजकुरापूर्वी पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

", अनुसूची ख च्या नोंद ६ च्या कक्षेत येणाऱ्या मालाच्या व्यतिरिक्त अन्य ;";

(ख) पोट-कलम (२) वगळण्यात येईल;

(ग) समास टीपेमधील " एकमुखी विक्रीकर बसवणे " या मजकुराऐवजी " विक्रीकर बसवणे " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१४. मुंबई विक्रीकर अधिनियमाच्या कलम ९ मधील, खंड (घ) नंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५१ याच्या कलम ९ ची सुधारणा.

" परंतु, दिनांक १ मे २००२ रोजी किंवा त्यानंतर सुरू होणाऱ्या कालावधीच्या बाबतीत जर, कोणत्याही व्यापाऱ्याचे कर दायित्व,—

(क) लगतपूर्वीच्या वर्षामध्ये एक कोटी रुपयांहून अधिक झाले असेल ; किंवा

(ख) उक्त कालावधीत एक कोटी रुपयांहून अधिक झाले, तर,—

उक्त कालावधीच्या पहिल्या दिवसापासून, किंवा यथास्थिति, कर दायित्व एक कोटी रुपयांपेक्षा अधिक होण्याच्या दिवसापासून, उलाढाल कर, दीड टक्के या दराने आकारण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, " कर दायित्व " या शब्दप्रयोगाचा अर्थ, कलम ४२ किंवा नियम यांच्या तरतुदींनुसार दिलेला कोणत्याही करप्रतिग्रहाच्या, वजावटीच्या किंवा, यथास्थिति, परताव्याच्या समायोजनाशिवाय, आकारलेला किंवा आकारावयाचा विक्रीकर आणि खरेदीकर, असा आहे.".

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५१ याच्या कलम १० ऐवजी नवीन कलम समाविष्ट करणे.

**१५.** मुंबई विक्रीकर अधिनियमाच्या कलम १० ऐवजी, १ मे २००२ पासून, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

अनुसूची " ग " मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालावर फेरविक्रीकर बसविणे.

" **१०.** अनुसूची " ग " मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालाच्या फेरविक्रीच्या उलाढालीवर, जेव्हा तो फेरविक्री केलेला माल, नोंदणीकृत व्यापाऱ्याकडून खरेदी केलेला असेल तेव्हा अशा उलाढालीमधून पुढील उलाढाल वजा केल्यानंतर, ०.५ टक्के दराने फेरविक्रीकर आकारण्यात येईल :—

(एक) कलम ८क अन्वये काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेच्या कक्षेत येणाऱ्या मालाच्या विक्रीची उलाढाल ;

(दोन) उक्त अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये ज्या मालाच्या विक्रीच्या उलाढालीसमोर विनिर्दिष्ट केलेला विक्रीकराचा दर, चार टक्क्यांपेक्षा कमी आहे, अशा मालाची उलाढाल ;

(तीन) कलम ४१ अन्वये काढलेल्या अधिसूचनेमुळे जो माल चार टक्क्यांपेक्षा कमीदराने विक्रीकर भरण्यासाठी पात्र आहे आणि जो उक्त अधिसूचनेच्या गट अ मध्ये विनिर्दिष्ट केलेला आहे, त्या मालाच्या विक्रीची उलाढाल ;

(चार) अनुसूची ' क ' च्या भाग दोन मधील नोंद ३७ च्या कक्षेत येणाऱ्या मालाची फेरविक्री ;

(पाच) राज्य शासनाकडून **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वेळोवेळी, अधिसूचित करण्यात येईल अशा पुढील मालाच्या विक्रीची उलाढाल,—

(क) उक्त अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये ज्यांच्यासमोर विनिर्दिष्ट केलेला विक्रीकराचा दर हा चार टक्के आहे असा माल, किंवा

(ख) कलम ४१ अन्वये काढलेल्या अधिसूचनेमुळे जो माल चार टक्के इतक्या दराने विक्रीकर भरण्यासाठी पात्र आहे आणि उक्त अधिसूचनेच्या गट अ मध्ये जो विनिर्दिष्ट केलेला आहे असा माल.".

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५१ मध्ये कलम ३३ग समाविष्ट करणे.

**१६.** मुंबई विक्रीकर अधिनियमाच्या कलम ३३ख नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल व ते दिनांक १ जुलै १९८१ पासून समाविष्ट करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :—

कंपन्यांचे एकत्रीकरण.

" **३३ग.** (१) जेव्हा एखाद्या न्यायालयाच्या किंवा केंद्र सरकारच्या आदेशाद्वारे दोन किंवा अधिक कंपन्यांचे एकत्रीकरण करावयाचे असेल आणि तो आदेश उक्त आदेशाच्या दिनांकाच्या पूर्वीच्या दिनांकापासून अंमलात येणार असेल आणि अशा कोणत्याही दोन किंवा अधिक कंपन्यांनी, असा आदेश अंमलात येण्याच्या दिनांकास प्रारंभ होणारा व अशा आदेशाच्या दिनांकास संपणाऱ्या कालावधीमध्ये एकमेकींना कोणताही माल विकला असेल किंवा एकमेकींकडून खरेदी केला असेल तेव्हा उक्त एकत्रीकरण आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, अशा विक्रीचा व खरेदीचा व्यवहार हा, संबंधित कंपन्यांच्या विक्रीच्या किंवा यथास्थिति, खरेदीच्या उलाढालीमध्ये समाविष्ट करण्यात येईल आणि तदनुसार त्यावर कराची आकारणी करण्यात येईल, आणि या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, उक्त दोन किंवा अधिक कंपन्या ह्या विभिन्न कंपन्या म्हणून समजण्यात येतील व उक्त आदेशाच्या दिनांकापर्यंतच्या संपूर्ण कालावधीसाठी त्या तशाच समजण्यात येतील, आणि उक्त कंपन्यांची नोंदणी

प्रमाणपत्रे ही, उक्त एकत्रीकरण आदेशाच्या दिनांकापासून, आवश्यकता असेल त्याप्रमाणे, रद्द करण्यात येतील, किंवा त्यात सुधारणा करण्यात येईल.

१९५६ चा १. (२) या कलमामध्ये वापरण्यात आलेले, परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, कंपनी अधिनियम, १९५६ मध्ये त्यांना जे जे अर्थ नेमून दिलेले असतील ते ते अर्थ असतील.''.

१७. मुंबई विक्रीकर अधिनियमाच्या कलम ३८ च्या पोट-कलम (४) मधील चौथ्या परंतुकाऐवजी पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :-- सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५१ याच्या कलम ३८ ची सुधारणा.

'' परंतु आणखी असेही की, या अधिनियमामध्ये किंवा नियमांमध्ये किंवा एखाद्या प्रोत्साहनपर प्रकर्षित योजनेमध्ये किंवा वीज निर्मिती प्रचालन धोरण, १९९८ यांमध्ये याविरूद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या पात्र युनिटांना विक्रीकर, खरेदी कर, अतिरिक्त कर, उलाढाल कर किंवा यथास्थिति, अधिभार यांच्या विलंबावधीच्या रूपाने प्रोत्साहन उपलब्ध होण्यासाठी हक्क प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे त्या युनिटांना, त्यांनी लांबणीवर टाकलेल्या करप्रदानाऐवजी विहित करण्यात येईल अशा निव्वळ विद्यमान मूल्याइतक्या रकमेचा भरणा त्यांच्या विकल्पानुसार, लांबणीवर टाकलेल्या कर प्रदानाऐवजी मुदतीपूर्वीच करता येईल आणि लोकहितार्थ असा भरणा केल्यानंतर, लांबणीवर टाकलेला कर चुकता करण्यात आला आहे, असे मानण्यात येईल.''.

१८. मुंबई विक्रीकर अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची ' क ' मध्ये, नोंद ४ मधील, स्तंभ (३) मध्ये, अपवाद (१) नंतर पुढील मजकूर जादा दाखल करण्यात येईल :-- सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५१ याच्या अनुसूची ' क ' ची सुधारणा.

'' अपवाद (२).--'' नोंदणीकृत व्यापार चिन्हाखाली विक्री करण्यात आला असेल त्या व्यतिरिक्त.''.

१९. मुंबई विक्रीकर अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची ' ख ' मध्ये, नोंद ६ मधील, उप-नोंद (एक) मध्ये '' कच्चे लोखंड व '' या मजकुराऐवजी '' कच्चे लोखंड, मृदू लोखंड व '' हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल आणि तो ११ मे २००१ पासून समाविष्ट करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल. सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५१ याच्या अनुसूची ' ख ' ची सुधारणा.

२०. मुंबई विक्रीकर अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची ' ग ' मध्ये.-- सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५१ याच्या अनुसूची ' ग ' ची सुधारणा.

(क) भाग एक मधील नोंद ३ नंतर, पुढील नोंद समाविष्ट करण्यात येईल :--

'' ३ क. नोंदणीकृत व्यापार चिन्हाखाली विकण्यात येणारा लोफ किंवा रोल किंवा स्लाईसेसच्या स्वरूपातील भाजलेला किंवा अन्य प्रकारचा पाव. ४ टक्के ४ टक्के. '';

(ख) भाग दोन मधील,--

(एक) नोंद ३२ मध्ये, स्तंभ (२) मधील, '' , मग ती औषधीयुक्त केलेली असो वा नसो '' हा मजकूर वगळण्यात येईल ;

(दोन) नोंद ३४ मध्ये, स्तंभ (२) मधील '' – मग ते औषधीयुक्त असोत वा नसोत '' हा मजकूर वगळण्यात येईल ;

(तीन) नोंद ३७ मध्ये,--

(१) स्तंभ (२) मधील, खंड (१), (२) व (३) वगळण्यात येतील ;

(२) स्तंभ (३) व (४) मध्ये '' ८ टक्के '' या मजकुराऐवजी '' ९ टक्के '' हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## प्रकरण सात

### महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ याची सुधारणा.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ५ ची सुधारणा.

२१. महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ (या अधिनियमात, यापुढे ज्याचा निर्देश " व्यवसाय कर अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम ५ मधील,—— १९७५ चा महा. १६.

(क) पोट-कलम (५) मधील, " मालकाच्या बाबतीत विलंबाच्या प्रत्येक दिवसाकरिता वीस रुपयांपेक्षा अधिक नसेल आणि इतर व्यक्तींच्या बाबतीत विलंबाच्या प्रत्येक दिवसाकरिता पाच रुपयांपेक्षा अधिक नसेल इतकी शास्ती " या मजकुराऐवजी, " अशा मालकाच्या बाबतीत, विलंबाच्या प्रत्येक दिवसाकरिता पाच रुपये आणि अशा व्यक्तीच्या बाबतीत, विलंबाच्या प्रत्येक दिवसाकरिता दोन रुपये इतकी शास्ती " हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) पोट-कलम (६) मधील, " एक हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल अशी शास्ती " या मजकुराऐवजी, " अधिनियमान्वये देय असलेल्या कराच्या तिपटीइतक्या रकमेची शास्ती " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ६ ची सुधारणा.

२२. व्यवसाय कर अधिनियमाच्या कलम ६ मधील, पोट-कलम (३) मधील, " विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी पाच रुपयांपेक्षा अधिक नसेल अशी शास्ती " या मजकुराऐवजी, " प्रत्येक विवरणासाठी तीनशे रुपयांची शास्ती " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम १० ची सुधारणा.

२३. व्यवसाय कर अधिनियमाच्या कलम १० मधील, " देय कराच्या रकमेच्या पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक होणार नाही इतकी शास्ती " या मजकुराऐवजी, " देय कराच्या रकमेच्या दहा टक्क्यांइतकी शास्ती " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या अनुसूची एक ची सुधारणा.

२४. व्यवसाय कर अधिनियमाच्या अनुसूची एक मधील, नोंद १६ ऐवजी, पुढील नोंद दाखल करण्यात येईल :—

" १६. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदणी केलेल्या किंवा नोंदणी केल्याचे समजण्यात आलेल्या आणि कोणताही व्यवसाय, व्यापार किंवा आजीविका यात गुंतलेल्या सहकारी संस्था,—— १९६१ चा महा. २४.

| | | | |
|---|---|---|---|
| (एक) राज्य पातळीवरील संस्था | . . | दरसाल | २,५०० ; |
| (दोन) सहकारी साखर कारखाने व सूत गिरण्या | . . | दरसाल | २,५०० ; |
| (तीन) जिल्हा पातळीवरील संस्था | . . | दरसाल | ५०० ; |
| (चार) वरील (एक), (दोन) आणि (तीन) खंडाच्या कक्षेत नसलेल्या इतर सर्व सहकारी संस्था. | . . | दरसाल | ५०० .". |

## प्रकरण आठ

### महाराष्ट्र ऐषआराम सेवांवरील कर अधिनियम, १९८७ याची सुधारणा.

१९८७ चा महा. ४१. २५. महाराष्ट्र ऐषआराम सेवांवरील कर अधिनियम, १९८७ (या अधिनियमात यापुढे, ज्याचा निर्देश " ऐषआराम सेवांवरील कर अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ मधील,— सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २ ची सुधारणा.

(क) खंड (ग) मधील, उपखंड (एक) मधील, " प्रति व्यक्ती किंवा प्रति सदस्य " या मजकुराऐवजी, " प्रत्येक निवासी जागेसाठी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (ओ-१) च्या स्पष्टीकरणामधील, खंड (ब) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :—

" (क) न बनवलेला तंबाखू आणि बनवलेला तंबाखू यामध्ये प्रति किलोग्रॅम रुपये २०० पेक्षा अधिक नसेल अशा किमतीस विकल्या जाणाऱ्या जर्द्याचा समावेश होत नाही ;".

२६. ऐषआराम सेवांवरील कर अधिनियम याच्या कलम ३ मधील, पोट-कलम (२) मधील,— सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ३ ची सुधारणा.

(क) खंड (अ), (ब) आणि (क) मध्ये " प्रति व्यक्ती " हा मजकूर जेथे जेथे आला आहे, तेथे तेथे त्याऐवजी, " प्रत्येक निवासी जागेसाठी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

" परंतु, जेव्हा आकार दैनिक तत्त्वावर न बसविता अन्य प्रकारे बसविण्यात येत असतील तेव्हा, या कलमान्वये करदायित्त्व निर्धारित करण्यासाठी, जेवढ्या कालावधीकरिता आकार बसविण्यात आलेला आहे अशा त्या जागेच्या एकूण कालावधीच्या आधारे, प्रतिदिन प्रत्येक निवासी जागेसाठी त्या त्या प्रमाणात आकाराची गणना करण्यात येईल.".

२७. ऐषआराम सेवांवरील कर अधिनियमाच्या कलम ३ब मध्ये, पोट-कलम (२) मधील, तक्त्यातील, नोंद ३ वगळण्यात येईल. सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ३ब ची सुधारणा.

## प्रकरण नऊ

### महाराष्ट्र कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या हस्तांतरणावरील विक्रीकर (पुनरधिनियमित) अधिनियम, १९८९ याची सुधारणा.

१९८९ चा महा. ३६. २८. महाराष्ट्र कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या हस्तांतरणावरील विक्रीकर (पुनरधिनियमित) अधिनियम, १९८९ (या अधिनियमात, यापुढे ज्याचा निर्देश " कार्य-कंत्राट अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम ६अ मधील,— सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६ याच्या कलम ६अ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (७) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल आणि ते, दिनांक १ एप्रिल २००१ पासून दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :—

" (७) पोट-कलम (१) च्या खंड (एक) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु पोट-कलम (८) च्या अधीन राहून, आपसमेळाच्या मार्गाने देय असलेली रक्कम,—

(एक) दिनांक १ एप्रिल २००० रोजी किंवा त्यानंतर, ते ३१ मार्च २००१ पर्यंत दिलेल्या कोणत्याही प्रकारच्या कंत्राटाच्या बाबतीत एकूण कंत्राट मूल्याच्या तीन टक्के इतकी असेल ; आणि

(दोन) दिनांक १ एप्रिल २००१ रोजी किंवा त्यानंतर, दिलेल्या कोणत्याही प्रकारच्या कंत्राटाच्या बाबतीत एकूण कंत्राट मूल्याच्या चार टक्के इतकी असेल.'';

(ख) पोट-कलम (८) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल आणि ते, दिनांक १ एप्रिल २००१ पासून दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :—

'' (८) ज्याच्यावर मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ खाली आकारण्यात आलेला कर भरण्यात आला आहे असे तयार कॉंक्रीट मिश्रण वगळून, तयार कॉंक्रीट मिश्रणाच्या स्वरूपातील मालमत्तेच्या हस्तांतरणाचा—मग ती कार्य-कंत्राटाच्या अंमलबजावणीत माल म्हणून असो किंवा इतर कोणत्याही स्वरूपात असो—समावेश असलेल्या दिनांक १ एप्रिल २००१ रोजी किंवा त्यानंतर दिलेल्या कोणत्याही कंत्राटास, या कलमातील कोणतीही गोष्ट लागू असणार नाही : १९५९ चा मुंबई ५१

परंतु, जो तयार कॉंक्रीट मिश्रणाचा निर्माणक-नि-कार्य-कंत्राटदार आहे अशा व्यापाऱ्याकडून अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या कंत्राटाच्या बाबतीत किंवा उप-कंत्राटाच्या बाबतीत, आणि ज्याची या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये तयार कॉंक्रीट मिश्रणावर देय असलेल्या कराची रक्कम स्वतःहून भरण्याची इच्छा आहे, त्यास कलम ५-अ च्या खंड (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, देय असलेल्या कराच्या अशा रकमेऐवजी, कार्य-कंत्राटाच्या एकूण कंत्राटमूल्यातून, पुढील व्यक्तींकडून केलेल्या माल खरेदीच्या उलाढालीचे मूल्य वजा करून येणाऱ्या रकमेच्या पंधरा टक्के इतकी रक्कम आपसमेळाद्वारे ठोक कराची रक्कम म्हणून भरता येईल,—

(एक) मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ खाली ज्याची नोंदणी करण्यात आली आहे आणि ज्याचे नोंदणी प्रमाणपत्र, अशा खरेदीच्या दिनांकास अंमलात आहे, अशा व्यापाऱ्याकडून ; किंवा १९५९ चा मुंबई ५१.

(दोन) मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ खाली जिची नोंदणी केलेली नाही परंतु अशा प्रकारे खरेदी केलेल्या मालावर जिने उक्त अधिनियमाखालील कर भरलेला आहे अशा व्यक्तीकडून, १९५९ चा मुंबई ५१.

आणि त्याने असा भरणा केल्यास, या कलमाच्या सर्व इतर तरतुदी तद्नुसार लागू होतील.''.

सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६ याच्या अनुसूचीची सुधारणा.

२९. कार्य-कंत्राट अधिनियमास जोडलेल्या अनुसूचीमधील, नोंद क्रमांक २ मध्ये '' जमिनीवर '' या शब्दाऐवजी '' तयार कॉंक्रीट मिश्रणावर, जमिनीवर '' हा मजकूर दाखल करण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई